## "मावा गडचिरोली (माझा गडचिरोली)" उपक्रम

**"मावा गडचिरोली"** या उपक्रमांतर्गत आरोग्य व पोषण, कृषी व संलग्न सेवा, शिक्षण, कौशल्य विकास, आर्थिक समावेशन इत्यादी विभागातील सर्वोत्कृष्ट सूचना/कल्पना/विचार संदर्भातील दिलेल्या एकूण ११ विषयांपैकी सर्वोत्कृष्ट अशा कल्पनांना/ विचारांना प्रत्येकी रु. १००००/- चे पारितोषीक वितरीत करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेची अंतिम दिनांक ही दि. १७.०६.२०१८ ऐवजी दि. ३०.०६.२०१८ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तेव्हा कृपया सदर उपक्रमाची निशुल्क प्रसिद्धी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून करण्यात यावी.

### ***आपल्या कल्पना/ विचार यासाठी निवडक प्रश्नावली खालीलप्रमाणे***

- **आरोग्य व पोषण :-**

१) समाजातील कुर्मा घर प्रथा बंद करण्यासाठी काय उपाय योजना करता येईल ?

२) बाळंतपणातील सुतक प्रथा बंद करण्यासाठी काय उपाय योजना करता येईल ?

३) अंगणवाडी च्या माध्यमातून बालकांना व तसेच गर्भवती स्त्रिया व स्तनदा मातांना यांना सरस चौकस आहार च्या अनुषंगाने आणखी काही बदल करावे, असे आपणास वाटते काय?

- **कृषी व संलगन् सेवा :-**

४) जास्तीत जास्त शेतक-यांनी कृषी पुरक व्यवसाय करण्यासाठी आवश्यक बदल काय करावेत ?

*(कृषी पुरक व्यवसाय- कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, रेशीम उत्पादन, मत्स्यपालन इ.)*

५) परसबागेमध्ये शेती *(संतुलित आहारासाठी घ्यावयाची स्थानिक पिके, पालेभाज्या, फळभाज्या)* चे प्रमाण वाढविण्यासाठी काय करावयास हवे?

६) गडचिरोली ब्रांड : धान पिकाची उत्पादकता वाढविणे, साठवणुक, मुल्यवर्धन व ब्रॅन्डिंग होण्यासाठी काय अपेक्षित आहे?

- **रोजगार :-**

७) वनोपज संकलनातून रोजगार निर्मितीस चालना देऊन अधिक उत्पन्न मिळण्याच्या दृटीने काय प्रयत्न व्हावयास हवे, असे आपणास वाटते?

८) स्वयंरोजगाराकरीता स्थानिक प्रचलित व्यवसायांच्या अनुषंगाने आवश्यक प्रशिक्षण वर्ग असावयास हवे काय? असल्यास कोणत्या व्यवसायासाठी?

- **शिक्षण :-**

९) प्राथमिक शिक्षण - जिल्ह्यातील आव्हाने, गरजा व उपाययोजना तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्याकरिता शाळांमध्ये काय बदल करावयास हवे, असे आपणास वाटते?

१०) शिक्षणामध्ये / शाळा व्यवस्थापनामध्ये पालकांचासक्रीय सहभाग वाढण्यासाठी काय करावयास हवे, असे आपणास वाटते?

➢ **आर्थिक समावेशन :-**

११) जिल्ह्यातील अधिकाधिक भागात बँकिंक सुविधा व्यापक प्रमाणात वाढवून त्याद्वारे विविध बँकिंग सेवा व शासकीय योजनांचे अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहाचविण्यासाठी आपल्या काय सूचना आहेत?

**अटी व शर्ती:**

- सदर स्पर्धा ही सर्व नागरिकांकरिता निशुल्क व खुली असून, वयाचे कोणतेही बंधन नाही.
- प्रत्येक स्पर्धक वरील ११ पैकी १ किंवा सर्व विषयांवर आपल्या सूचना/कल्पना/विचार सयुक्तिक तर्कासहीत व मुद्देसूद रितीने बंद लिफाफयात सुवाच्च अक्षरात वा टंकलिखित वा ई-मेलद्वारे करुन जिल्हाधिकारी कार्यालयास दि. ३०.०६.२०१८ चे सायंकाळी ५ वाजेपूर्वी सादर करतील.
- स्पर्धकाने प्रत्येक विषयाच्या शेवटी स्वत:चे नाव, पत्ता (पिनकोडसह) व मोबाईल क्रमांक अवश्य नमूद करावे.
- सदर स्पर्धेकरिता जिल्हास्तरीय निकाल समितीचे निकाल हे अंतिम असून याबाबत कोणत्याही प्रकारचे आव्हान करता येणार नाही.
- कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही टप्प्यावर सदर स्पर्धा रद्द करण्याचे व अंशत: वा पूर्णत: बदल करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना असतील.
- **अर्ज सादर करण्याचा पत्ता :**

  जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कॉम्प्लेक्स, मूल रोड, गडचिरोली, पिन कोड-४४२६०५

  ई-मेल आईडी : mawagadchiroli@gmail.com